## ॥ बाबा ॥

## भोजन

बाबांना आवडते, ममद्यांना आवडते
आवडते भोजनाचे पान, बाबांना आवडते भोजनाचे पान ॥
शरणांगतीच्या चुलीवर, शिजवावा भात
ज्ञान, संयमाचे घालून तूप
विवेकाचा वरी असे साज... बाबांना ॥ 1 ॥
बुध्दी तेलाची फोडणी
तीन ऊँकारी मसाला
करावी भाजी छान... बाबांना ॥ 2 ॥
षड्‌रिपुचे पुरण करून, नम्रतेचे घालून मोहन
कराव्या पोळ्या लहान... बाबांना ॥ 3 ॥
चटणी, कोशिंबीर प्रेमाची, भोवती रांगोळी आदराची
नैवेद्य तो नामरूपी, सुंदर बनवावे ताट... ॥ 4 ॥
नित्य सजवावे देहाचे ताट
त्यात लाविली आत्मज्योत
बाबांने केला भोजनाचे थाट
दाखविली मुक्तीची वाट ... ॥ 5 ॥